**ठळक बातम्या**

- विधानसभेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन संस्थगित, पावसाळी अधिवेशन ३० जूनपासून मुंबईत सुरू होणार, विधानसभेच्या उपाध्यक्षपदी अण्णा बनसोडे यांची निवड

- देशाची आतापर्यंतची प्रगती संविधान आणि त्यातून निर्माण झालेल्या व्यवस्थेमुळे झाल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- राज्यातल्या सर्व महसूल मंडळांमध्ये ‘छत्रपती शिवाजी महाराज महा-राजस्व समाधान शिबिर योजना’ सुरू होणार

- शेअर बाजारातल्या तेजीला लगाम, मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ७२९ अंकांची घसरण

**आणि**

- खेलो इंडिया पॅरागेम्स स्पर्धेत महाराष्ट्राच्या दिनेश बागडे याला पॉवरलिफ्टिंगच्या १०७ किलो वजनी गटाचं सुवर्णपदक

**<><><><><>**

विधानसभेचे उपाध्यक्ष म्हणून अण्णा बनसोडे यांची निवड झाल्याची घोषणा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज केली. या पदासाठी बनसोडे यांचा एकमेव अर्ज आला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी त्यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला आणि सर्व सदस्यांनी एकमताने त्याला मंजुरी दिली. बनसोडे हे आमदार म्हणून तिसऱ्यांदा निवडून आले आहेत.

राज्य सरकारच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमामध्ये राज्यातल्या ५० विकास योजना आणि पाच नगर रचना योजनांना मंजुरी देण्यात आल्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधान परिषदेत निवेदनाद्वारे केली. पाच नगर रचनांमध्ये पंढरपूर, औंढा नागनाथ आणि अक्कलकोट या तीर्थक्षेत्रांचा देखील समावेश असल्याचे त्यांनी सांगितले.

मुंबईतल्या सांताक्रूझ, पार्ले आणि कुर्ला या भागात विमानतळाच्या फनेल झोनमधील उंचीच्या निर्बधांमुळे बाधित इमारतींचा पुनर्विकासाला चालना मिळावी यासाठी बृहन्मुंबई विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावली-२०३४ मध्ये स्वतंत्र तरतूद करण्यात आल्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात केली. यामुळे निर्बंध असलेल्या बृहन्मुंबई क्षेत्रातील बाधित क्षेत्रातील जुन्या इमारतींचा पुनर्विकास सुसह्य होणार असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

ब्रिटीशांच्या काळातल्या काही विशिष्ट इमारतीमुळे मुंबईची एक वेगळी ओळख आहे. जागतिक दर्जाच्या मुंबई शहरात वैशिष्ट्यपूर्ण आयकॉनिक इमारतींना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाने नवीन धोरण तयार केल्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात केली.

दिवसभराच्या कामकाजानंतर अर्थसंकल्पीय अधिवेशनातलं विधानसभेचं कामकाज संस्थगित झालं. पावसाळी अधिवेशन ३० जूनपासून मुंबईत सुरू होणार आहे, असं अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी जाहीर केलं. या अधिवेशनात १९ बैठका झाल्या. त्यात ९ विधेयकं मंजूर झाली. या अधिवेशनात एकूण १४६ तास कामकाज झालं, अशी माहिती अध्यक्षांनी दिली.

**<><><><><>**

तीस लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या इलेक्ट्रिक वाहनांवर सहा टक्के कर लावण्याचा निर्णय सरकारनं घेतला होता, मात्र मंत्रिमंडळात यावर चर्चा होऊन असा

कर लावण्याची गरज नाही असा निर्णय झाला. त्यामुळे हा कर लावला जाणार नाही असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी विधानपरिषदेत एका प्रश्नाचे उत्तर देताना सांगितलं. सर्व सरकारी वाहनं तसंच मंत्र्यांची वाहनं टप्प्याटप्प्याने इलेक्ट्रिक करण्यात येतील असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. आमदारांना यापुढे फक्त इलेक्ट्रिक वाहनांसाठीच कर्ज दिलं जाईल असंही त्यांनी सांगितलं.

यूपीएससीच्या धर्तीवर एमपीएसीच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने घेण्याचा निर्णय कोणत्याही परिस्थितीत मागे घेणार नाही असं मुख्यमंत्र्यांनी आज विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं. हा निर्णय २०२२ मध्येच झाला होता, मात्र लगेच अंमलबजावणी करू नये अशी मागणी झाल्यानं याच्या अंमलबजावणीला २०२५ पर्यंत मुदत दिली होती. काही मूठभर शिकवणी वर्ग या विरोधात परीक्षार्थींना फूस लावत आहेत, मात्र ही परीक्षा पद्धती विद्यार्थ्यांच्या हिताची आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले. भाजपाचे प्रवीण दरेकर यांनी विचारलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते. भाजपाचे गटनेते प्रवीण दरेकर यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या प्रवक्त्या सुषमा अंधारे यांच्याविरोधात हक्कभंगाचा प्रस्ताव विधानपरिषदेत मांडला. कॉमेडियन कुणाल कामरा याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक गाणं गाऊन त्यांचा अपमान केला. त्याचं समर्थन अंधारे यांनी केलं. हा सभागृहाचा अपमान आहे, असं दरेकर म्हणाले. हा प्रस्ताव विशेषाधिकार समितीकडे पाठवल्याचं सभापती राम शिंदे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

देशाचं संविधान हे विकासाचे अस्त्र आहे. देशाची आतापर्यंतची प्रगती संविधान आणि त्यातून निर्माण झालेल्या निर्माण झालेल्या व्यवस्थेमुळे झाल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत केलं. संविधानाला ७५ वर्ष पूर्ण झाल्यामुळे आयोजित चर्चेत ते बोलत होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे देशात संविधानाच्या माध्यमातून सामाजिक, राजकीय,

आर्थिक क्रांती झाली. बाबासाहेबांनी या संविधानात केवळ वंचितांचा नव्हे तर प्रत्येक व्यक्तीचा विचार केला, असे मुख्यमंत्री म्हणाले.

या संविधानाने लोकशाही ही सर्वात मोठी भेट या देशाला दिली. भारतीय ज्ञान, परंपरा यांचा सन्मान केला. समृद्ध राष्ट्रीय परंपरेला छेद देणाऱ्या अनेक रूढी परंपरा यात टाळल्या आहेत, असं त्यांनी सांगितलं. समान नागरी कायदा लागू करण्याची जबाबदारी बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व राज्यांना दिली. गोवंश हत्या बंदी कायदा संविधानानुसार आहे, याकडे फडणवीस यांनी लक्ष वेधलं. सामाजिक विषमता असेपर्यंत आरक्षण कायम राहील. त्याचवेळी जनसुरक्षा कायद्यातून कुठल्याही मूलभूत अधिकाराचे हनन होत नसल्याचं ते म्हणाले. मुख्यमंत्र्यांनी संविधानावर अतिशय अभ्यासपूर्ण भाषण केले. या भाषणाचे पुस्तक करा, अशी शिफारस शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार भास्कर जाधव यांनी केली. अध्यक्षांनी त्याला मंजुरी दिली आणि पुस्तक तसेच डिजिटल स्वरूपात हे भाषण जतन करू, असे आश्वासन विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलं.

**<><><><><>**

राज्यातल्या सर्व महसूल मंडळांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज ‘महा-राजस्व समाधान शिबिर योजना’ सुरू होत असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानभवन परिसरात माध्यमांशी बोलताना दिली. वर्षातून चारवेळा हे शिबिर लावण्यात येणार असून २५ हजार रुपयांचं अनुदान सरकार देणार असल्याचं ते म्हणाले. या शिबिरात नागरिकांना त्यांच्या तक्रारी मांडता येतील, आणि महसुली मुख्यालयापर्यंत जावं लागणार नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

भारतीय शेअर बाजारांमध्ये सलग सात सत्रांमधल्या वाढीनंतर आज घसरण दिसून आली. मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकात आज ७२९ अंकांची घसरण झाली आणि तो ७७ हजार २८९ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा

निफ्टीही १८२ अंकांची घसरण नोंदवत २३ हजार ४८७ अंकांवर बंद झाला. स्मॉल कॅप आणि मिडकॅप प्रकाराच्या समभागांमध्ये घसरणीचा प्रभाव दिसून आला.

<><><><><>

दिव्यांगांसाठीच्या खेलो इंडिया स्पर्धेत महाराष्ट्राच्या दिनेश बागडेने पॉवरलिफ्टिंगच्या १०७ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावलं आहे. दिव्येश लडानीला रौप्य तर जोगिंदर सिंगला कांस्यपदक मिळालं. ज्येष्ठांच्या ८६ किलो वजनी गटात अरुणमोळी अरुणगिरीला सुवर्ण, प्रभाबेन शियाळला रौप्य तर समीमबेन व्होराला कांस्यपदक मिळालं.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज राजस्थान रॉयल्स आणि कोलकत्ता नाईट रायडर्स यांच्यात सामना होत आहे. गुहाहाटी इथल्या बरसापारा स्टेडियम इथं हा सामना होणार आहे. थोड्याच वेळात, साडेसात वाजता सामन्याला सुरुवात होईल. कोलकत्ता नाईट रायडर्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला.

<><><><><>

जम्मू-काश्मीर इथे नियंत्रण रेषेनजीक कर्तव्यावर असताना शहीद झालेल्या संगमनेर तालुक्यातले रामदास बढे यांच्यावर त्यांच्या गावी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. शहीद बढे हे लष्कराच्या ३४ एफडी रेजिमेंटमध्ये हवालदार पदावर कार्यरत होते. परवा तंगधार सेक्टरमध्ये कर्तव्य बजावत असताना बढे यांना वीरमरण आलं.

//<><><><><>//